तातडीचे
अंदाजपत्रक
कालमर्यादा १८/०८/२०१८
स्मरण पत्र कं. २

सन २०१९-२० वर्षाकरिता नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अदाजपत्रक तयार करणेबाबत.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभाग

जाकं./अप्रवि/अंसेनियो/६४९/२०१८ दिनांक: १०/०८/२०१८

## परिपत्रक

शासन निर्णय क्र. कृषिआ–१११०/(प्र.क्र.१००)/६–अे, दि. ०५/०३/२०११ अन्वये नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना कृषि विद्यापिठास सन २०११–१२ पासून लागु केलेली आहे. त्यानुसार सन २०१९–२० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक विहित प्रपत्रात सादर करणे आवश्यक आहे. तरी सर्व आहरण व संवितरण अधिका–यांना सुचित करण्यात आले होते की, सन २०१९–२० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सोबत जोडलेल्या प्रपत्रात दोन प्रतित दि. ३१/०७/२०१८ पर्यत नियंत्रक कार्यालयास सादर करण्याचे परिपत्रकाद्वारे सुचित केले होते. परंतु या कार्यालयाच्या असे निर्दशनास आले आहे की, ब–याच आहरण व संवितरण अधिकारी यांनी नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अंदाजपत्रक या कार्यालयास अद्यापही सादर केलेले नाही.

सदर अंदाजपत्रक तयार करतांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेसाठी तरतूद माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२० असे एकूण १२ महीन्यांची करावी. प्रत्येक कर्मचा–यांचे मुळ वेतन दिंनाक ०१/०४/२०१९ रोजी सेवा पुस्तकानुसार दर्शवून त्याप्रमाणे मागणी प्रस्तावित करावी. (**पुढील जुलै २०१९ महिण्यातील वेतन वाढ लक्षात घेवून**)

शासनाने विहीत केलेल्या मुदतीत विद्यापिठाचे अंदाजपत्रक कृषि परिषदेमार्फत शासनास सादर करावयाचे असल्यामुळे सर्व आहरण व संवितरण अधिका–यांना पुन्हा सुचित करण्यात येते की, परिपत्रकासोबत जोडलेले **प्रपत्र अ** आणि **प्रपत्र ब** यातील प्रत्येक रकान्यामधील माहिती काळजीपूर्वक भरून सन २०१९–२० मधील नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अंदाजपत्रक दिनांक **१८/०८/२०१८** पर्यत न चुकता या कार्यालयास सादर करावे.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलीपी:-
१. नियंत्रक अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)
२. कुलगरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना मा. कुलगुरूंचे माहितीकरिता सादर

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला